M T W T F S S
Page No.: १
Date:
YOUVA

# कविता — आचार संहिता

सदाचार - दुराचार दोघे एक आड
दोघांची आचार संहिता - काही ते पाहू ॥

नाकासमोर चालणे - सदाचाराचा धर्म
वाकडीवाट वळणे - दुराचाराचे निहित कर्म ॥

सर्वसमभाव सदाचाराचे खणखणीत नाणे
वितंडवाद हेच दुराचाराचे गंजलेले नाणे ॥

सदाचार - दुराचार - तराजुच्या तागड्या दोन
कोणची झुकती - कोणची उसळीत विचारसरणीवर अवलंबून ॥

खाचखळग्याची - सरळ सोपी वाट जीवनाची दोन वळणे
डावीकडे - उजवीकडे वळायचे - ज्याचे त्याने ठरविणे ॥

सदाचाराची पावले सरळ सोपी पायवाट चालतात
दुराचाराची पावले खाचखळग्यात ठेचकाळतात ॥

दीपज्योत साऱ्यांना ऊर्जा-शक्ती देते प्रकाशातून
प्रकाशाचा रंग ठरवायचा असली नकली चष्म्यातून ॥

स्वभावाला - विचाराला रामबाण औषध नसते
कडू कारले तुपात तळले साखरेत घोळले तरी कडूच लागते ॥

सुधा मराठे
ज्ञानी कुमारी कॉलनी
पौड रोड हीनतीर्थ
कोथरूड . पुणे ३८
Mo - ९९२१२९४३३४.